# राज्यातील चार मंत्री हनी ट्रॅपच्या जाळ्यात

## राऊतांचा खळबळजनक आरोप; भाजपच्या दोन मंत्र्यांचा समावेश

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील हनी ट्रॅपच्या प्रकरणात राज्याचे चार मंत्री अडकले आहेत. त्यातील दोन भारतीय जनता पक्षाचे आहेत, असा खळबळजनक आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी सोमवारी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना केला. हनी ट्रॅपच्या माध्यमातून आमदार, खासदार फोडून त्यांना भाजपमध्ये घेऊन शुद्धीकरण करून घेतल्याचा दावाही राऊत यांनी यावेळी केला.

हनी ट्रॅपची सुरुवात दिल्लीतून झाली होती. महाविकास आघाडीचे सरकार पाडण्यासाठी हनी ट्रॅपचा सापळा रचण्यात आला. याच माध्यमातून १६-१७ आमदार, चार खासदार भाजपने गळावा लावले. प्रफुल्ल लोढावर हनी ट्रॅपचे गुन्हे दाखल झाले आहेत. त्याचा गिरीश महाजन सोबतचा फोटोही आहे. याची सुत्रे जामनेर, जळगाव, नाशिक, मुंबई आणि दिल्ली येथून हललेली आहेत. ज्यांनी त्याला वापरले तेच हनी ट्रॅपमध्ये अडकले आहेत. यात सरकारमधील चार मंत्री आहेत आणि हे फडणवीस यांना माहिती आहे, असे राऊत म्हणाले.

प्रफुल्ल लोढाकडील पेन ड्राईव्ह, सीडी शोधण्यासाठी पोलीस जंगजंग पछाडत आहेत. लोढा हा भाजपचा हस्तक असून त्याच्या माध्यमातून ठिकठिकाणी विरोधी पक्षाच्या आणि स्वतःच्या लोकांवरही हनी ट्रॅप लावले. पण हे स्वतः वर उलटल्याने धावाधाव सुरू झाली. त्यामुळे भाजपची जी वॉशिंग मशीन आहे, त्यामध्ये काही डाग धुतले जात नाहीत. त्यातील हा एक डाग आहे, असा सणसणीत टोला राऊत यांनी लगावला.

महाविकास आघाडीचे सरकार पाडताना जे वेष पालटून जात होते, ते याच कारणातून एकमेकांना भेटत होते. हुडी घालून मरीन लाईनच्या पुलाखाली काळोखात भेटत होते. या सीडी प्रकरणामुळेच काही लोकांना दरदरून घाम फुटला आणि त्यांनी पटापट उड्या मारून सूरतचा रस्ता पकडला, असा आरोप राऊत यांनी यावेळी केला.

# फाशी रद्द, तात्काळ सोडा... मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपींची निर्दोष सुटका

**मुंबई–** मुंबईला हादरवून टाकणाऱ्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व आरोपींची मुंबई उच्च न्यायालयाने काल निर्दोष मुक्तता केली आहे. न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती श्याम चांदक यांच्या विशेष खंडपीठाने हा ऐतिहासिक निकाल दिला. या निर्णयामुळे ९ वर्षांपूर्वी सत्र न्यायालयाने ठोठावलेल्या शिक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच यातील एकूण १२ दोषींना तात्काळ तुरुंगातून सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे या प्रकरणाला कलाटणी मिळाली आहे.



मुंबईत ११ जुलै २००६ रोजी साखळी बॉम्बस्फोट झाले होते. याप्रकरणी २०१५ मध्ये सत्र न्यायालयाने १३ आरोपींपैकी १२ जणांना दोषी ठरवले होते. यात पाच जणांना फाशीची शिक्षा तर उर्वरित सात जणांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली होती. यानंतर याप्रकरणी दोषींनी या शिक्षेला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. तर राज्य सरकारने फाशीच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब करण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. गेल्या सहा महिन्यांपासून यावर सुनावणी सुरू होती.

याप्रकरणी सुनावणी पार पडली. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा फाशीची शिक्षा सुनावणारा निर्णय रद्द केला. तसेच, राज्य सरकारने फाशीची शिक्षा कायम ठेवण्याची केलेली मागणीही न्यायालयाने फेटाळून लावली. विशेष म्हणजे, ज्या सात आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती त्यांचीही निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश कोर्टाने दिले आहेत. या प्रकरणात एकूण १२ आरोपी होते, ज्यापैकी एका आरोपीचा तपासादरम्यान मृत्यू झाला होता. तर येरवडा, नाशिक, अमरावती आणि नागपूर कारागृहात असलेल्या दोषींनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणीला हजेरी लावली.

या प्रकरणात सादर करण्यात आलेले पुरावे तथ्यपूर्ण नाही. त्यामुळे, आरोपींना दोषी ठरवण्यासाठी सबळ आणि पुरेसे पुरावे नसल्याने कोर्टाने या सर्वांची निर्दोष सुटका केली आहे. या निकालामुळे गेल्या १९ वर्षांपासून सुरु असलेल्या खटल्याला वेगळे वळण मिळाले आहे.

**११ जुलै २००६ रोजी काय घडले होते?**

११ जुलै २००६ रोजी मुंबई लोकल ट्रेनमध्ये ११ मिनिटांच्या कालावधीत सात भीषण स्फोट झाले होते. या स्फोटांमध्ये १८९ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता, तर ८२७ प्रवासी जखमी झाले होते. या हल्ल्यात आरडीएक्सचा वापर करण्यात आला होता. दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) आणि बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंध) कायदा (यूएपीए) अंतर्गत नोव्हेंबर २००६ मध्ये आरोपपत्र दाखल केले होते. या प्रकरणात १३ आरोपींना अटक करण्यात आली होती. तर १५ जणांना वॉन्टेड घोषित करण्यात आले होते, त्यापैकी काही पाकिस्तानमध्ये असल्याचा आरोप आहे.

# पेरण्या जोमात; पावसात खंड पडल्याने पिके सलाईनवर

## जिल्ह्यात ९१ टक्के पेरणी; शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** यंदा समाधानकारक पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला, तसेच मान्सूनपूर्व पावसाने जोरदार बॅटिंग केल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या. त्यामुळे खरीपाच्या पेरण्या देखील जोमात म्हणजे ९१.३० टक्के झाल्या आहेत. मात्र, गेल्या काही दिवसांपासून पावसाने ओढ दिल्याने पिकांची वाढ खुंटले आहे. येत्या काही दिवसात पावसाने हजेरी लावली तरच पिकांना जीवदान मिळेल. सध्या तरी शेतकरी पावसासाठी आभाळाकडे डोळे लावून बसले आहेत.

सध्या खरीप हंगामातील पेरणी झालेली पिके वाढीच्या अवस्थेत असून आंतरमशागतीचे काम सुरू आहे. मात्र पावसात खंड पडल्यामुळे पिकांची वाढ खुंटली आहे. त्यासाठी पावसाची आवश्यकता आहे.जिल्ह्यात जुलै महिन्यात आतापर्यंत ३३.८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. सरासरी या महिन्यात ६० मिलीमीटर पावसाची नोंद होते. त्यापेक्षा निम्माच पाऊस या २१ दिवसात झालेला आहे. विशेष म्हणजे या २१ दिवसात केवळ पाच दिवस पाऊस झाला आहे. सहाजिक खरीप हंगामातील पिकांवर त्यांचा परिणाम झाला आहे. यंदाच्या खरीपासाठी ७ लाख १६ हजार २०८.६ हेक्टर क्षेत्राचे नियोजन करण्यात आले असून आतापर्यंत ६ लाख ५३ हजार ८६७.४९ हेक्टर क्षेत्रावर खरीपाच्या विविध पिकांची पेरणी झाली आहे. म्हणजे ९१.३० टक्के पेरणी झाली. त्यात मका व तूर पिकांचे क्षेत्र वाढले आहे. मकाची १२२ टक्के तर तूरची १०२ टक्के पेरणी झाली. मकासाठी ७७ हजार ९९९ हेक्टर क्षेत्राचे उद्दीष्टे ठेवण्यात आले होते. मात्र ९५ हजार ७४० हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. तर तूरसाठी ६४ हजार ५८४ हेक्टरचे उद्दीष्टे असतांना ६६ हजार १५ हेक्टरवर पेरणी झाली आहे.

पिकानिहाय पेरणी पुढीलप्रमाणे आहे. भात विकाचे सरासरी क्षेत्र १८ हजार ७४५ असून ६ हजार १५५ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. बाजरीसाठी सरासरी क्षेत्र ८९ हजार ६२९ हेक्टर क्षेत्र असून ५६ हजार ७१० हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. मुगचे सरासरी क्षेत्र ५१ हजार ९८० हेक्टर असून आतापर्यंत ४७ हजार ७२९ हेक्टर क्षे९ावर पेरणी झाली आहे. उडीदसाठी सरासरी क्षेत्र ६७ हजार ५९५ हेक्टर असून त्यापैकी ६६ हजार १९६ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सुर्यफूलसाठी सरासरी क्षेत्र २१७ हेक्टर असून ४३ हेक्टरवर पेरणी झाली आहे. भुईमुगसाठी सरासरी क्षेत्र ६ हजार ५९९ हेक्टर असून ४ हजार २२० हेक्टरवर पेरणी झाली. सोयाबीनसाठी १ लाख ७८ हजार ५०५ हेक्टर सरासरी क्षेत्र असून १ लाख ७१ हजार १८७ हेक्टर पेरणी झाली. तर कापूस पिकासाठी सरासरी क्षेत्र १ लाख ५५ हजार ३२८ हेक्टर असून आतापर्यंत १ लाख ३४ हजार ९५२ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे.

सध्या कापूस व मका पिकांवर कीड पडली असून कापूस पिकावर मावा व तुडतुडे या किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे तर मकावर अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. यावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी कृषी विभागाने कीड नियंत्रणासाठी औषध फवारणी करण्याची सुचना केली आहे.

# अल्पसंख्यांक विभागाकडून विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती

**पुणे (प्रतिनिधी)–** अल्पसंख्याक विकास विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांना परदेशात मोफत उच्च शिक्षण घेता यावे, या उद्देशाने सन २०२५--२६ करिता शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांना अल्पसंख्यांक विभागाचे अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येणार आहे.

अर्ज करण्याची अंतिम मुदत १ ऑगस्ट २०२५ च्या सायंकाळी सहा वाजेपर्यंत आहे. तसेच विद्यार्थ्यांना अर्जाची छायाप्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रत्यक्ष किंवा टपालाने समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च रोड, पुणे ४११००१ येथे पाठवावी लागणार आहे. या शिष्यवृत्ती योजनेचा जास्तीत जास्त अल्पसंख्याक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त विनोद मोहतुरे यांनी केले आहे.

# हनी ट्रॅपचे प्रकरण दडपण्याचा सरकारचा प्रयत्न- सपकाळ

**मुंबई (प्रतिनिधी)–**राज्यातील काही मंत्री आणि अधिकारी हनी ट्रॅपच्या जाळ्यात अडकले आहेत. पण राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी असे काहीच घडले नसल्याचे निवेदन केले. सवयीप्रमाणे मुख्यमंत्री धादांत खोटे बोलले. या हनी ट्रॅपचे धागेदोरे भाजपच्या अत्यंत जवळ पोहचले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या अत्यंत निकटच्या मंत्र्याबरोबर हनी ट्रॅपशी संबंधित व्यक्तीचा फोटो झळकल्याने या प्रकरणातील गांभीर्य अधिकच गडद झाले असून सरकार हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सोमवारी केला. याशिवाय हनी ट्रॅपची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली.

गेल्या आठवड्यात हनी ट्रॅप प्रकरण उघडकीस आल्यानंतर त्याचे पडसाद विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात उमटले होते. काँग्रेसच्या नाना पटोले यांनी हे प्रकरण विधानसभेत लावून धरले होते. मात्र, मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकरणाची फारशी दखल घेतली नाही.

## पान १ वरुन

### ‘ऑपरेशन सिंदूर’वर चर्चेसाठी सरकार...

अभियान आहे. या ऑपरेशनची देशभरात सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. यावर विस्तृत चर्चा होण्याची शक्यता आहे.

या पावसाळी अधिवेशनात संसदेत अनेक महत्त्वाच्या विधेयकांवर चर्चा केली जाईल. निश्चित केलेल्या कार्यक्रमानुसार अनेक महत्त्वपूर्ण कायदे आणि धोरणांवर विचारमंथन होणार आहे. यात मभारतीय डाक विधेयकफ यावर लोकसभेत ३ तास चर्चा होईल, तर मआयकर सुधारणा विधेयकफ यावर १२ तासांपर्यंत चर्चा करण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय मराष्ट्रीय क्रीडा विधेयकफ यासाठी ८ तासांचा कालावधी निश्चित करण्यात आला असून मणिपूर अर्थसंकल्प या विधेयकावर २ तास चर्चा होणार आहे.

**आणीबाणीच्या ५० व्या वर्षपूर्तीनिमित्त चर्चेची मागणी**

या प्रमुख विधेयकांव्यतिरिक्त इतर काही महत्त्वाच्या मुद्द्यांवरही चर्चा करण्याची मागणी करण्यात आली आहे. तेलुगू देसम पार्टीने १९७५ च्या आणीबाणीच्या ५० व्या वर्षपूर्तीनिमित्त चर्चा करण्याची मागणी केली आहे, तर भाजप खासदार अनुराग ठाकूर यांनी हिमाचल प्रदेशात नुकत्याच झालेल्या मुसळधार पाऊस आणि पूर परिस्थितीवर चर्चा करण्याची विनंती केली आहे.

**पावसाळी अधिवेशनाचे वेळापत्रक**

संसदेचे हे पावसाळी अधिवेशन २१ जुलैपासून सुरू झाले असून ते २१ ऑगस्टपर्यंत चालेल. एकूण ३२ दिवसांच्या या सत्रात २१ बैठका प्रस्तावित आहेत. स्वातंत्र्यदिन सोहळ्यासाठी संसदेचे कामकाज १२ ऑगस्ट ते १७ ऑगस्टपर्यंत तहकूब राहील आणि १८ ऑगस्ट रोजी पुन्हा सुरू होईल. या सत्रात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे ज्याचा देशाच्या राजकारणावर आणि धोरणांवर परिणाम होईल.

### एलसीबीचे पोलीस उपनिरीक्षक...

अधीक्षक कार्यालयात नेण्यात आले व तेथेच एका विशिष्ट बँक खात्यावर ऑनलाईन पैसे ट्रान्सफर करण्यास भाग पाडण्यात आले. ही संपूर्ण रक्कम उपनिरीक्षक धाकराव यांनी दिलेल्या खात्यावर ट्रान्सफर झाल्याचे तो म्हणाला.

दरम्यान, या आरोपांची गंभीरता लक्षात घेता उपनिरीक्षक धाकराव, कर्मचारी मनोहर गोसावी, बापूसाहेब फोलाणे, गणेश भिगारदे यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांची चौकशी आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक डॉ. शरद गोडे हे करीत आहेत. दरम्यान, गुन्ह्याचा तपास भरकटवण्यासाठी संशयित आरोपीने पोलीस तपासात ही माहिती दिली असल्याचा अंदाज काही पोलीस अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

### परब यांच्याविरोधात हक्कभंग...

राज्यमंत्री योगेश कदम यांनी सोमवारी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अनिल परब यांनी केलेल्या आरोपांना उत्तर दिले.

### क्राउड फंडिंगच्या माध्यमातून...

कॉर्पोरेट कंपन्या, दाते आणि रुग्णालये यांचे सहकार्य रूग्णांना मिळणार असून, त्यातून हजारो रुग्णांना दिलासा मिळणार आहे.

राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना महागड्या वैद्यकीय उपचारांचा लाभ देता यावा यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या पुढाकारातून त्रिपक्षीय करार लवकरच करण्यात येणार आहे. यात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, कार्पोरेट कंपनी, रूग्णालय आणि त्यासोबत काही प्रमाणात रूग्णांचेही योगदान अपेक्षित आहेत. राज्यात प्रथमच मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून रूग्णांसाठी क्राउड फंडिंग सुरू करण्यात येत आहे. ज्या रुग्णांच्या उपचाराचा खर्च १० लाखांपेक्षा अधिक असेल, असे दुर्धर व गंभीर आजाराचे रूग्ण क्राउड फंडिंगसाठी पात्र ठरणार आहेत. या अशा रूग्णांना कक्षा तर्फे बनविण्यात आलेल्या स्वतंत्र पोर्टल मार्फत अर्ज सादर करावा लागणार आहे. तीन महिन्याच्या कालावधीत हे पोर्टल कार्यरत होणार आहे. ज्यावेळी रूग्णांच्या उपचाराचा खर्च कोट्यवधीमध्ये असतो, त्यावेळी सर्व योजनांचा फायदा घेवूनही निधीची कमतरता भासते, त्यावेळी क्राउड फंडिंग महत्त्वाचे ठरणार आहे. रूग्णांच्या पात्रतेची तपासणी आणि पारदर्शक प्रक्रियेसाठी नियामक यंत्रणा स्थापन करण्यात येणार आहे. ही सुविधा ग्रामीण आणि शहरी भागातील गरजू रुग्णांसाठी वरदान ठरेल.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी, कॉर्पोरेट कंपन्या / दाते/ ङ्गएनजीओफ आणि रुग्णालय मिळून रुग्णांच्या उपचाराकरिता मदत करणार आहेत. तीन महिन्यांच्या कालावधीत क्राउड फंडिंग सुरू केले जाणार आहे. रूग्णांनी फक्त आमच्याकडे अर्ज करावा, उर्वरित जबाबदारी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून पार पाडण्यात येणार आहे. रूग्णांना वेळेत उपचार मिळावेत याकरिता मुख्यमंत्री मा.श्री देवेंद्र फडणवीस यांच्या विचारातून ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली जात आहे. असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख श्री रामेश्वर नाईक यांनी कळविले आहे.

**आता परदेशातून निधी स्वीकारता येणार**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीला परदेशातून निधी स्वीकारण्यासाठी आवश्यक असलेली एफसीआरए (फॉरेन काँट्रीब्युशन रेग्यूलेशन अॅक्ट) मान्यता नुकतीच प्राप्त झाली आहे. यामुळे परदेशातील दानशूर व्यक्ती, संस्था, सीएसआर कंपन्यांकडून थेट आर्थिक मदत स्वीकारता येणार आहे. उल्लेखनिय बाब अशी की, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महाराष्ट्र हे एफसीआरए प्रमाणपत्र मिळवणारे देशातील पहिलेच राज्य ठरले आहे. या परदेशी निधीचा वापर गरजू रुग्णांच्या उपचारासाठी करण्यात येणार आहे.

**धर्मादाय रुग्णालयांची भूमिका**

या योजनेमध्ये धर्मादाय रुग्णालयांचा सहभाग महत्वाचा आहे. शासनाकडून मिळणाऱ्या करसवलतींच्या बदल्यात, या रुग्णालयांना त्यांच्या एकूण खाटांपैकी १० टक्के खाटा वार्षिक उत्पन्न १.८० लाखांपर्यंत असलेल्या कुटुंबांसाठी मोफत राखीव ठेवाव्या लागतात. तर, १० टक्के खाटा ३.६० लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी सवलतीच्या दरात उपचाराकरिता राखीव ठेवाव्या लागतात. या व्यवस्थेमुळे गरीब रुग्णांना मोठ्या रुग्णालयांतून उपचार मिळतात. अर्ज प्रक्रिया किंवा इतर कुठल्याही प्रकारच्या माहिती व मार्गदर्शनाकरिता टोल फ्री क्रमांक १८०० १२३ २२११ वर संपर्क साधावा.

**सहा महिन्याच्या काळातील मुख्यमंत्री सहाय्यता निधीची मदत**

१ जानेवारी ते ३० जून २०२५ पर्यंत मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षातून १४ हजार ६५१ रूग्णांना १२८ कोटी ६६ लाख ६८ हजार रूपयांची मदत करण्यात आली. तर, धर्मादाय रूग्णालय मदत कक्षातून १ जानेवारी ते ३१ मे २०२५ दरम्यान २ लाख ३२ हजार २६५ रूग्णांना १६५ कोटी ४ लाख २४ हजार ८५७ रूपयांची मदत करण्यात आली.

### जिल्ह्यात प्रारूप प्रभाग रचनेवर...

रचनेचा आराखडा जाहीर केला होता. यावर सोमवार २१ जुलैपर्यंत हरकती व सुचना देण्याची शेवटी मुदत होती. या मुदतीमध्ये ८८ तक्रारी दाखल झाल्या आहेत. १४ जुलै रोजी जिल्हा परिषदेचे ७५ व पंचायत समितीचे १५० गणांमध्ये समाविष्ट असलेल्या गावांची नावे व नकाशा जाहीर केला होता. २०११ च्या लोकसंख्येच्या आधारवर प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा जाहीर केला होता. झेड पद्धतीने हा आराखडा तयार करण्यात आला. अकोल्याच्या समशेरपूर पासून ते जामखेडच्या खर्डापर्यंत असा हा प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा जाहीर झाल्यानंतर हरकती व सुचना पाऊस पडेल असे वाटले होते. प्रत्यक्षात मात्र ८८ तक्रारी आल्या असून सर्वाधिक जामखेडच्या ४० तक्रारी आहे.

**गटातील गाव या गट व गणात पाहिजे होते. किंवा या गावाचा समावेश या गट व गणात करण्यात यावा, गट व गणाचे नाव पूर्वी जे होते तेच ठेवण्यात यावे, पूर्वी ज्या गट व गणात गाव होते त्याच गट व गणात ते ठेवण्यात यावे, दोन गावांची ग्रुप ग्रामपंचायत असून एक गाव या गणात तर दुसरे गाव त्या गणात गेले आहे. ते एकाच गणात ठेवण्यात यावे अशा स्वरूपांच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत.**

**हरकती व सुचना निभाव लागणार का?**

तक्रारीचे स्वरूप पाहता त्या गंभीर किंवा दखल घ्यावी, अशा वाटत नाही. नाशिक येथे विभागीय आयुक्तांसमोर या हरकती व सुचनाचा निभाव लागणार नाही, असे दिसत आहे. दाखल झालेल्या २८ जुलैपर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सुचनाच्या आधारे अभिप्रायासह विभागीय आयुक्तांना प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. ११ ऑगस्टपर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावनणी घेऊन निर्णय घेतला जाणार असून १८ ऑगस्टला अंतिम प्रभाग रचना मान्यतेसाठी राज्य निवडणूक आयोग किंवा प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडे सादर केली जाणार आहे. याच दिवशी जिल्ह्यातील गट आणि गणांची अंतिम प्रभाग रचना जाहीर होणार आहे.

### जैवइंधन, जैवऊर्जानिर्मिती धोरण...

सालीमठ यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीस साखर संचालक (प्रशासन) केदारी जाधव, साखर संचालक (अर्थ) यशवंत गिरी, साखर सह संचालक (उपपदार्थ) अविनाश देशमुख यांच्यासह राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ, वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे (विस्मा) व्यवस्थापकीय संचालक अजित चौगुले, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे अधिकारी, इथेनॉल असोसिएशनचे आर. जी. माने, कोजन असोसिएशनचे श्रीकांत शिंदे व अन्य अधिकारी उपस्थित होते.

केंद्र सरकारने ऊसापासूनच्या उपपदार्थ निर्मितीसाठी प्रोत्साहनपर धोरणे लागू केलेली आहेत. त्यास अनुसरुन राज्य सरकारचेही ठोस धोरण असणे आवश्यक असल्याने या समितीचा अहवाल महत्त्वपूर्ण ठरणार आहे. जैवइंधन व जैवऊर्जा या दोन्ही क्षेत्रांमध्ये प्रचंड संधी असून हे पर्यावरणपूरक, स्वदेशी आणि शाश्वत इंधन स्रोत आहे. कारखान्यांना केवळ साखरेवर अवलंबून न राहता इथेनॉल, बायो सीएनजी, सौर ऊर्जा, हरित हायड्रोजन उपप्रकल्पांकडे वळण्याची आवश्यकता आहे. तरच साखर उद्योगात आर्थिक शाश्वतता शक्य असल्याचे मत बैठकीत मान्यवर सदस्यांनी व्यक्त केल्याची माहिती बैठकीनंतर अधिकाऱ्यांनी दिली. साखर उद्योगातील उपपदार्थ निर्मितीच्या प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने कॉम्प्रेस्ड बायोगॅस तथा सीबीजी, मळीपासूनचे इथेनॉल (१ जी), मल्टीफीड, बगॅस व अन्य जैव कचऱ्यापासूनच इथेनॉल (२ जी), सॅफ तथा सस्टेबनेबल व्हिएशन फ्युएल, सहवीज निर्मिती प्रकल्प, सौर ऊर्जा प्रकल्प, हरित हायड्रोजन, जैव रसायने धोरण, बायो-बिटुमेन धोरण या दहा प्रकल्पांचा समावेश आहे.

### राज्य शिक्षक गुणगौरव...

उमेदवारांचे अर्ज १ ते ३ ऑगस्ट या कालावधीत संचालक स्तरावर तपासले जातील. त्यानंतर ४ ते ८ ऑगस्ट या कालावधीत जिल्हास्तरावर प्रत्यक्ष शाळा भेट दिली जाईल. पुढे ११ ते १४ ऑगस्ट या कालावधीत जिल्हास्तरावरील मुलाखती आणि पडताळणी करून संचालक कार्यालयाकडे शिफारस केली जाईल. राज्यस्तरावरील मुलाखती या १८ ते २१ऑगस्ट या कालावधीत घेतल्या जातील. २२ ते २४ ऑगस्टपर्यंत राज्यशिक्षक पुरस्कारासंदर्भातील सर्व काम संचालक स्तरावरून पूर्ण केले जाईल. त्यानंतर २५ ऑगस्ट रोजी राज्य निवड समितीच्या सदस्यांची अंतिम बैठक घेतली जाईल. निवड समितीने अंतिम शिफारस केलेल्या शिक्षकांच्या यादीसह सर्व माहिती शासनाकडे २८ ऑगस्ट रोजी सादर केले जाईल. त्यानंतर १सप्टेंबर रोजी शासन निर्णय प्रसिद्ध करून पात्र शिक्षक पुरस्कार उमेदवारांची नावे घोषित केली जातील आणि प्रत्यक्ष पुरस्कार वितरण समारंभ ५ सप्टेंबर रोजी आयोजित केला जाईल.

### अभियांत्रिकीची अंतिम गुणवत्ता...

घेतलेल्या परीक्षेची संधी हुकलेल्या विद्यार्थ्यांसाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अतिरिक्त सीईटी घेण्याचा निर्णय घेतला होता. या अतिरिक्त सीईटीसाठी नोंदणी केलेल्या ४० हजार ६६७ विद्यार्थ्यांपैकी ३२ हजार ८३९ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते. ही संख्या एकूण परीक्षार्थींच्या ८० टक्के एवढी होती.

### ‘त्या’ मंदिरात पुन्हा प्रवेश...

बाळासाहेब शिवरकर, ड. एल. टी. सावंत,, संयोजक राहुल डंबाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. सप्तर्षी म्हणाले, महाराष्ट्रात राहणाऱ्या १२ ॥ कोटी जनतेने आपल्या मतदानाद्वारे विधानसभेत लोकांच्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी २८८ लोकप्रतिनिधी निवडून दिलेले असतात, त्यांनी लोकांच्या सुख दुःखाचे, भावनांचे, सोयी-गैरसोयीचे प्रतिनिधीत्व करायचे असते, या कर्तव्याचा आम्हाला सातत्याने जाणीव असायची, त्यासाठी आम्ही फक्त माध्यम आहोत, हे आम्ही लक्षात ठेवायचो. सभागृहाचे खरे मालक राज्यात राहणारे नागरिक आहेत, जनहिताला मारक कायदे या कायदेमंडळात संमत होणार नाहीत हे डोळयात तेल घालून पाहायचे, हे अल्पमतातल्या विरोधकांचे कामच असते, तसेच ज्यांनी विधीमंडळात बहुमत प्राप्त केले असेल, त्यांनी सरकार स्थापन करून जनहिताचे रक्षण करणे, जनताभिमुख धोरणे अंमलात आणून राज्याचा विकास करणे, ही कामे अपेक्षित असतात,

सध्या मात्र गंगा उलट्या दिशेने वाहू लागली आहे. आमदार संवादापेक्षा एकमेकांना साता जन्माचे वैरी मानू लागले आहेत, आमदार गोपीचंद पडळकर हे सरकार पक्षाचे प्रतिनिधीत्व करतात. ते मुख्यमंत्र्याचे खास, विशेष लाडके आहेत. सातत्याने विरोधी पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांना अर्वाच्य भाषेत लाखोली वाहणे हे त्यांच्यावर सोपविलेले काम ते निष्ठेने पार पाहत असतात, १६ जुलै २०२५ रोजी त्यांनी कळस गाठला, विधानसभेच्या सुरक्षित परिसरात ते नामचीन गुन्हेगारांना घेऊन आले, त्या गुंडांमार्फत विरोधी पक्षांचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यावर त्यांनी जोरदार हल्ला चढविला, सारे आमदार या घटनेचे प्रेक्षक तर होतेच पण ही घटना कॅमेरात टिपल्यामुळे वृत्त वाहिन्यांमार्फत देशभर लोकांना याची देही याची डोळा पाहण्याचे भाग्य लाभले.

लोकशाहीचे मंदिर तोच उद्ध्वस्त करू शकतो, ज्याला लोकशाही अमान्य आहे, लोकशाही प्रणालीत सत्तारूढ पक्षाने विरोधी पक्षाला वैरी मानायचे नसते. परंतु महाराष्ट्राचे सरकार तिकडमबानी करून संधिसाधू प्रवृत्तींना एकत्र करून स्थापन झाले असल्यामुळे ते विरोधक संपुष्टात आणण्याचा प्रयत्न करीत आहे, हे स्पष्ट झाले आहे. आजचे विधीमंडळ बरखास्त करून नव्याने निवडणूक घेणे आवश्यक असल्याचे दिसते.

रामदास फुटाणे म्हणाले, आधी राजकारणाचे गुन्हेगारीकरण करण्यात आले जाता गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांनी सरकार ताब्यात घेतलेले दिसते, विरोधी पक्षांच्या मुसक्या बांधलेल्या, अशा अवस्थेत लोकशाहीच्या पवित्र मंदिराला उद्ध्वस्त करणारांचा आम्ही एकमुखाने तीव्र निषेध करतो आणि तो जनतेच्या कोर्टात नोंदवित आहोत. सध्या, लोकशाहीचे, प्रतिनिधीशाहीत रूपांतर झाले आहे, जनतेच्या प्रश्न वर आम्ही सभागृहात भान मात्र कुणाला मारणे किंवा मारनायर लोक पालन अ काळात नव्हते.

अॅड. वंदना चव्हाण म्हणाल्या, राज्याला आज गृहमंत्री आहेत की नाही असा प्रश्न पडत आहे, असतील तर कारवाई का होत नाही हा गंभीर पविषय आहे. राजकारण करणारे असे वागत असतील तर जनतेने काय करायचे. राज्यात शिक्षण, शेती, रोजगार हे गंभीर विषय आहेत मात्र विधिमंडळ मध्ये होत असलेल्या गोंधळात हे विषय मागे पडत चालले आहेत, परिणामी महाराष्ट्राची अधोगती होत असल्याचे दिसते.

बाळासाहेब शिवरकर म्हणाले, आज सभागृहात महाराष्ट्राच्या संस्कृतीला कलंक लावण्याचे काम सुरू आहे. आमदारांच्या काही समस्या, तक्रार असतील तर त्या एका समिती मार्फत सोडवल्या जातात, आज सत्ताधारी आमदार कुणाला मारहाण करतात हे चित्र विदारक आहे. राज्याच्या संविधानिक सभागृहाने जनतेला दिशा देण्याचे काम करायचे असते याचा विसर आजच्या राजकीय मंडळींना पडला आहे का असा सवाल उपस्थित होतो असेही शिवरकर म्हणाले.